ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 9 | October - 2016

Indian Streams Research Journal

# जळगांव जिल्हयात प्रक्रिया उदयोगाने केळी होईल ' कल्पतरु '

प्रा बी एल बाविस्कर
गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख , गि.द.महाजन कला, श्री. के.रा.नवलखा वाणिज्य आणि मनोहरशेठ धारीवाल विज्ञान महाविदयालय,जामनेर जि.जळगांव.



**प्रस्तावना -**

भारतीय अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राला अतिशय महत्वाचे स्थान असून शेती क्षेत्राच्या विकासावरच औदयोगिक विकास व आर्थिक विकास अवलंबून असतो. देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ५२% लोकसंख्या उपजिविकेसाठी शेती क्षेत्रावरच अवलंबून आहे. २०११ च्या जणगणनेनुसार ६८.८४% लोकसंख्या ग्रामीण भागात रहात असून त्यांचा व्यवसाय शेती आणि शेतीशी संबंधित व्यवसाय आहे. देशातील एकूण श्रमशक्तीपैकी ५२% पेक्षा जास्त श्रमशक्ती शेती व्यवसायात गुंतलेली आहे. त्यामुळे शेती हाच ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुलाधार आहे. ग्रामीण भागातील बेरोजगारी आणि अल्प रोजगारी हेच दारिद्रयाचे प्रमुख कारण आहे. ग्रामीण भागात शेती उत्पादनावर आधारीत प्रक्रिया उदयोगांना चालना दिली तर रोजगारी व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होऊ न ग्रामीण दारिद्रय कमी होण्यास निश्चितच मदत होईल. ग्रामीण भागातील श्रमशक्ति नागरी भागाकडे स्थलांतरीत होत आहे. त्यामुळे खेडी ओस पडू लागली आहेत. ग्रामीण श्रमशक्तिचे स्थलांतर रोखून ठेवण्यासाठी व्यावसायिक संरचेनमध्ये शेती आधारीत प्रक्रिया उदयोगांना चालना देण्याची नितांत गरज आहे. ग्रामीण भागाची समृध्दी व पुर्ननिर्माण कृषी प्रक्रिया उदयोगांच्या माध्यमातूनच शक्य आहे. जगातील अनेक राष्ट्रांनी ग्रामीण विकासासाठी कृषी प्रक्रिया उदयोगांना प्राध्यान्य दिलेले आढळते. देशाची वाढत जाणारी लोकसंख्या विकास प्रक्रियेत सामावून घेण्यासाठी ग्रामोदयोगांवर अधिक भर देण्याची गरज आहे. शेती क्षेत्राला नवसंजीवनी दिल्याशिवाय सर्वसमावेशक विकासाचे ध्येय साध्य करणे शक्य होणार नाही. कृषी प्रक्रिया उदयोगाच्या माध्यमातून शेतीला पर्यायाने ग्रामीण विकासाला चालना प्राप्त होवू शकते हे लक्षात घेवून भारत सरकारने 'मेक इन इंडिया' अंतर्गत शेती मालावर आधारीत प्रक्रिया उदयोगांना महत्व दिलेले आहे. 'मेक इन इंडिया' अंतर्गत ज्या सुविधा व सवलती देवू करण्यात आल्या आहेत त्यांचा लाभ शेतीमालावर आधारीत प्रक्रिया उदयोगांनाही होईल. या योजनेअंतर्गत १४ हजार कोटी रुपये कृ षी प्रक्रिया उदयोगासाठी खर्च केले जाणार आहेत. शिवाय या क्षेत्रात परकीय गुंतवणूकीला १००% मान्यता देण्यात आली आहे. सी.आय.आय. ने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार आगामी दशकात या क्षेत्रात रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या मोठया संधी निर्माण होणे अपेक्षित आहे. जगात केळी पिकाच्या उत्पादनात भारताचा पहिला क्रमांक असून भारतातील महाराष्ट्र राज्य केळी पिकाच्या लागवडीत आणि उत्पादनात अग्रेसर आहे. महाराष्ट्र राज्याला केळी पिकाच्या संदर्भात मानाचे स्थान मिळवून देण्यात जळगांव जिल्हयाचा सिंहाचा वाटा आहे.

महाराष्ट्र एक प्रगत आणि औदयोगिकदृष्टया अग्रक्रमाचे राज्य म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्राने देशाला वेळोवेळी नवनवीन योजना आणि आर्थिक पाठबळ दिलेले आहे. परंतु आज महाराष्ट्र शेतकऱ्यांच्या आत्महत्या, दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती यांसारख्या घटनांनी देशात चर्चिला जात आहे. ग्रामीण भागातील युवक इतरत्र स्थलांतर करीत आहेत. रोजगार

देणारा शेतकरी रोजगार शोधू लागले आहेत. अशा विपरित परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी शेती व्यवसायाला पुरक असणारी आणि खेडेगावांना आर्थिकदृष्टया सक्षम करणारे प्रक्रिया उदयोग गावागावात उभे करण्याची आवश्यकता आहे. युवकांना देशाचे आधारस्तंभ बनविण्यासाठी गावागावात शेती मालावर आधारित प्रक्रिया उदयोग स्थापन करुन खेडेगांवात रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधीमध्ये वाढ घडवून आणणे ही काळाची गरज आहे. यामुळे शेतकरी आणि युवकांना आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण, सशक्त आणि समृध्द करता येणे शक्य आहे.

जळगांव जिल्हा केळी पिकाचे आगार म्हणून राज्यातच नव्हे तर देशात प्रसिध्द आहे. केळी उत्पादनात राज्याची पताका देशभर, जगभर फडकविली याचे सर्व श्रेय जिल्हयातील केळी उत्पादक शेतकऱ्यांनाच आहे. तथापी समृध्दिची स्वप्ने साकारणाऱ्या केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या वाटेवर विविध प्रश्नांचे, समस्यांचे काटे पसरलेले आहेत. त्यातच केळीच्या बागा उध्वस्त करणारी अस्मानी संकटे, केळीच्या किंमतीत होणारे तीव्र चढ-उतार, केळीत रुतलेला करपा रोग या सारखी आव्हाने शेतकऱ्यांसमोर उभी आहेत. राज्यासह जिल्हयाच्या अर्थकारणात महत्वाची भूमिका पार पाडणाऱ्या केळी उत्पादक शेतकऱ्यांना शासनाने अक्षरशः वाऱ्यावर सोडून दिले आहे. जिल्हयातील शेतकरी आजवर कधीच संघटित झाला नाही. हिवाळी अधिवेशनात शासनातर्फे केळी प्रक्रिया उदयोग स्थापन करण्याची घोषणा केली जाते, परंतु प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी आजतागायत झालेली नाही. केळी पिकाला बाजारपेठेत भाव नसेल तर केळी शितगृहात ठेवावी लागते. अलिकडील काळात जिल्हयात काही ठिकाणी शीतगृहे उभारण्यात आाली. परंतू त्यात केळी उत्पादकांना हक्काची जागा कधीच मिळाली नाही. शेतकरी वर्ग संघटित नसल्यामुळे केळी कायमच सरकारी अनास्थेचा बळी ठरत राहिली आहे. महाराष्ट्र शासनाने फळबागांसाठी अनेक योजना जाहीर केल्या आहेत. परंतू केळी उत्पादक शेतकरी संघटित नसल्यामुळे शेतकऱ्यांना त्याचा लाभ झाला नाही. नियोजना अभावी केळी पिकाच्या किंमतींनी निचांक गाठल्यामुळे व्यापारी खुशीत तर शेतकरी दु:खात असे चित्र जिल्हयात सर्वत्र आहे. शासनाच्या प्रयत्नातून काहीतरी चांगले घडेल अशी आशा केळी उत्पादक शेतकरी बाळगून आहेत.

कोकणामध्ये नारळाला कल्पवृक्ष संबोधिले जाते. कारण नारळाच्या प्रत्येक भागापासून उपयुक्त उत्पादने तयार करता येतात. त्याचप्रमाणे केळी पिकाच्या घडापासून खोड पानापर्यंत प्रत्येक अवशेष शेतकऱ्यांना उत्पन्न मिळवून देणारा आहे. परंतु दुर्दैवाने जिल्हा केळी पिकाचे आगार म्हणून प्रसिध्द असला तरी केळी पिकावर प्रक्रिया करणारा एकही मोठा उदयोग अस्तित्वात नाही. प्रक्रिया उदयोगांना चालना दिल्यास कोकणात नारळ आणि जळगाव जिल्हयात केळी बागायतदारांना चांगले दिवस येवू शकतील. दिवसें दिवस वेगवान होत जाणारी जीवनशैली, पती-पत्नीचा अर्थार्जनाकडे वाढलेला कल, यामुळे प्रक्रियायुक्त उत्पादनाला असलेल्या मागणीत दिवेसंदिवस वाढ होत आहे. जागतिकीकरणाच्या काळात प्रक्रिया उदयोगांना अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे. अलिकडील काळात प्रक्रियायुक्त अन्नपदार्थ ही चैनिची बाब राहिलेली नसून ती एक गरज बनली आहे. आजच्या फास्टफुडच्या काळात लहानापासून वृध्दापर्यंत सर्वच प्रक्रियायुक्त पदार्थाकडे आकर्षिले जात आहेत. जिल्हयात उत्पादित होणाऱ्या केळी पिकावर प्रक्रिया करुन त्याचा टिकाऊपणा वाढवून कृषी विकासाबरोबरच ग्रामीण विकासाला चालना देणे शक्य आहे. ग्रामीण भागात प्रक्रिया उदयोग उभारुन ग्रामीण अर्थव्यवस्थेत गुणात्मक परिवर्तन घडवून आणणे शक्य आहे. केळी पिकापासून तयार होणाऱ्या उत्पादनाला देशातील आणि विदेशातील बाजारपेठांमध्ये चांगली मागणी आहे. जिल्हयातील शेतकरी प्रयोगशील आहे. प्रक्रिया उदयोगांना शेतकऱ्यांचा सकारात्मक प्रतिसाद मिळेल. शेतकऱ्यांना नवप्रयोगाशी जोडत केळी प्रक्रिया उदयोग सुरु झ ााले तर जिल्हयासाठी केळी पीक कल्पतरु ठरेल व जळगांवचे **'बनाना सिटी'** हे नाव सार्थक ठरेल.

### ✿ अध्ययन विषयाचे महत्व

फळे व भाजीपाला या मध्ये केळी महत्वाचे पीक असून सर्वसामान्यांच्या अवाक्यातील आवडीचे व पौष्टिक फळ आहे. केळी नगदी पीक असून या पिकामुळे शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळते. केळी उत्पादनात जिल्हयातील विविध घटक गुंतलेले असून हा व्यवसाय शेतकरी कुटुंबा बरोबरच इतर अनेक कुटुंबांचा जगण्याचा मुख्य आधार आहे. त्यामुळे केळी पीक जिल्हयाच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा आहे. केळी पिकावर प्रक्रिया करुन विविध उत्पादने तयार केल्यास मूल्यवृध्दीचा लाभ शेतकऱ्यांना मिळू शकतो. मुक्त अर्थव्यवस्था आणि ग्राहकांच्या वाढत्या क्रयशक्तिमुळे प्रक्रियायुक्त उत्पादनाला मोठी मागणी आहे. ग्रामीण दुर्गम व मागासलेल्या भागाच्या विकासासाठी प्रक्रिया उदयोग रामबाण उपाय असल्याचा अनुभव येत आहे. एका सर्वेक्षणानुसार ३५ % ग्राहकांना प्रक्रियायुक्त अन्नपदार्थाशिवाय पर्याय नाही. त्यामुळे येत्या दशकात प्रक्रियायुक्त पदार्थांच्या बाजारपेठेत अनेक पटीने वाढ होण्याची शक्यता आहे. केळी पिकापासून तयार होणाऱ्या उत्पादनाला निर्यातीच्या संघी आहेत. नोकरी मिळविण्याच्या अटीतटीच्या स्पर्धेत न उतरता स्वतःबरोबर इतरांनाही रोजगार उपलब्ध करुन देणाऱ्या नवउदयोजकांना प्रोत्साहन देण्याची खरी गरज आहे. ठोस प्रयत्नांतून जिल्हयात केळी प्रक्रिया उदयोग उभे राहिल्यास केळी पट्टयाला सुवर्ण झ ाळाळी येईल.

केळी असे फळ आहे की जे सर्वात स्वस्त असून बारमाही उपलब्ध होते. असे असूनही इतर फळांच्या तुलनेत केळीच्या किमतीमध्ये सर्वात जास्त चढउतार होतांना दिसतात. प्रक्रिया उदयोगांमुळे केळीच्या किमतीतील चढ-उतार कमी होण्यास मदत होईल. नैसर्गिक आपत्तीमुळे केळी पिकाचे नुकसान झाले तरी शेतकरी पूर्णपणे कोलमडणार नाही. प्रक्रिया उदयोगामुळे शासकिय मदतीशिवाय शेतकरी स्वावलंबी होतील. कारण नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले तरी कमी प्रमाणात का होईना त्यांना शाश्वत उत्पन्नाची हमी असेल.

शेतकऱ्यांबरोबरच केळी पिकाशी संबंधित असलेल्या प्रत्येक घटकाला रोजगार प्राप्त होवून केळी पिकाच्या अर्थकारणाला बळकटी प्राप्त होईल. केळीला आधारभूत किंमत नसल्यामुळे मोजकेच व्यापारी केळीचे भाव निश्चित करतात. शेतकऱ्यांची विविध मार्गांनी आर्थिक पिळवणूक करतात. शेतकऱ्यांनाही त्यांच्या शिवाय पर्याय नसतो. ही सर्व परिस्थिती लक्षात घेता केळी पिकाचे मूल्यवर्धन करण्यासाठी **'फूड पार्क'** च्या संकल्पनेला प्रोत्साहन देण्याची नितांत गरज निर्माण झाली आहे.

केळी पिकाचे झाड सर्वांग युक्त आहे. केळी फळापासून विविध अन्नपदार्थ तयार करता येतात. केळी पीकाच्या उर्वरित अवशेषांवर प्रक्रिया करुन विविध मानवउपयोगी उत्पादने तयार करता येतात. प्रक्रिया उदयोगांच्या माध्यमातून उत्पादीत होणाऱ्या उपपदार्थांच्या निर्यातीला अलीकडे अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत. शेती अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे. अनेक कुटुंबांच्या रोजी रोटीची सुरक्षा केळी व्यवसायावर अवलंबून आहे. शेतीचा व्यवसाय अधिक फायदेशीर बनविण्यासाठी शेतकऱ्यांचे रुपांतर शेती उदयोजकांमध्ये करण्यासाठी प्रक्रिया उदयोगांना चालना देण्याची गरज आहे. अन्न सुरक्षेच्या दृष्टीकोनातून नाशवंत कृषी उत्पादनांसाठी अन्न प्रकिंया उदयोगांचा विकास करणे आवश्यक आहे. प्रक्रिया उदयोग हा शेतीक्षेत्र आणि उदयोग क्षेत्राला जोडणारा महत्वाचा दुवा बनू शकतो. केळी प्रक्रिया उदयोग जिल्हयातील अनेक कुटंबांसाठी आर्थिक संजीवनीची भूमिका पार पाडू शकतील. शेती फायदेशीर ठरवायची तर आता तिला शेती व्यापाराचे रुप देण्याशिवाय पर्याय नाही. प्रयत्नांना कृतीची जोड दिल्यास केळी पीक जिल्हयासाठी **'कल्पतरु'** ठरेल यात शंका नाही.

### संशोधन पध्दती -

प्रस्तूत संशोधनासाठी प्राथमिक आणि द्वितीयक स्त्रोतांचा उपयोग करण्यात आला आहे. प्राथमिक माहितीसाठी प्रश्नावली, निरीक्षण, मुलाखत या तंत्रांचा उपयोग करण्यात आला आहे. तर द्वितीयक माहितीसाठी महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, जळगांव जिल्हा सामाजिक, आर्थिक समालोचन, केळी परिषदा व चर्चा सत्रांचे अहवाल या द्वितीयक स्त्रोतांचा उपयोग करण्यात आला आहे.

### अभ्यास विषयाची उद्‌दीष्टये

१) केळी प्रकिया उदयोगांच्या विकासाला प्रोत्साहन देणे.
२) केळी प्रकिया उदयोगांचा जलद गतीने विकास घडवून आणणे.
३) केळी प्रकिया उदयोगात रोजगार संधी निर्माण करणे आणि स्वयं रोजगारासाठी नवीन दालनांचा आढावा घेणे.
४) जळगांव जिल्हयाला केळी प्रकिया उदयोगात वैभव प्राप्त करुन देणे.
५) केळी प्रकिया उदयोगातील समस्यांचा आणि आव्हानांचा अभ्यास करुन उपाय योजना सूचविणे.

### केळी पीकापासून तयार होणारी मूल्यवर्धित उत्पादने

केळी शीघ्र विनाशी फळ आहे. केळी फळावर त्वरित प्रक्रिया करुन पदार्थ तयार केले तर मूल्यवर्धनातून शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न प्राप्त होवू शकते. केळी फळावर प्रकिया करुन तयार केलेल्या पदार्थांना बाजारपेठेत चांगली मागणी आहे. प्रक्रिया उदयोगांमुळे बेरोजगारांना रोजगाराच्या आणि स्वयं रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देता येवू शकतात. अन्न प्रक्रिया शाखेतील संशोधामुळे केळीपासून विविध उत्पादने तयार करणे शक्य झाले आहे. जगात केळी प्रक्रिया उत्पादनात फिलिपाईन्स देश आघाडीवर असून सौदी अरेबिया व संयुक्त अरब देश, अमेरीका, इंग्लंड, जपान, कॅनडा हे देश केळी प्रक्रियायुक्त पदार्थाचे मोठे आयातदार देश आहेत.

### अ) केळी फळापासून तयार होणारे पदार्थ -

१) केळी पीठ २) गोठवलेली केळी, सुकेळी ३) केळी बार पोळी ४) केळी ज्यूस ५) केळी जॅम व जेली
६) कॅन्डी ७) स्लायसेस ८) मिल्क शेक ९) टॉफी १०) वाईन ११) केळ फुलाचे लोणचे १२) केळी पूासन लोणचे
१३) केळी वेफर्स १४) केळी अंजीर १५) केळीची गोड चटणी १६) स्टार्च १७) केळी पल्प १८) चिवडा

### ब) केळी पिकाच्या अवशेषापासून तयार होणारी मूल्यवर्धित उत्पादने -

१) धागा निर्मिती २) कागद ३) पशु खादय ४) सालीपासून इथेनॉल ५) पानांपासून कप आणि प्लेट
६) शेतीसाठी सेंद्रीय खते

### क) इतर उत्पादनात होणारा केळी पिकाचा उपयोग -

१) बेबी फूड २) बिस्किट ३) ब्रेड ४) पंचामृत ५) आरोग्यवर्धक पये ६) लाडू

केळी पिकापासून विविध प्रकियायुक्त उत्पादने तयार केली तर त्यांना बाजारपेठेत चांगली मागणी आहे . केळी औषधी सत्व असलेले पीक बेरोजगारांना रोजगार व स्वंरोजगारांच्या संधी उपलब्ध करुन देणारे आहेत. युवकांनी या पीकाचा उपयोग विविध प्रक्रिया उत्पादने तयार करण्यासाठी करुन स्वयंरोजगारांच्या दृष्टीने विचार करावा यासाठी उपयुक्त असे मार्गदर्शन.

**केळी प्रक्रिया उदयोगातील बलस्थाने**

१) जळगाव जिल्हा केळी पिकाचे माहेरघर असून केळीच्या लागवडीतील आणि उत्पादनात आघाडीवर आहे. त्यामुळे बारमाही कच्च्या मालाचा पुरवठा होतो.
२) लागवड योग्य आणि पडिक जमीनी केळी पिकाच्या लागवडी खाली आणण्यास प्रचंड वाव आहे.
३) वाढती लोकसंख्या, वेगाने होणारे नागरीकरण, केंद्र व राज्य सरकारने प्रक्रिया उदयोगांना देवू केलेली मदत व सवलती याचा लाभ प्रक्रिया उदयोगांना मिळेल.
४) जळगांव जिल्हा केळी निर्यात क्षेत्र म्हणून अपेडाने (Agricultural & Processed Food Export) जाहीर केल्यामुळे निर्यातीसाठी संधी उपलब्ध आहेत.
५) शासनाने अन्नप्रक्रिया उदयोगाला प्राथमिक उदयोगांचा दर्जा देण्याकडे कल ठेवल्याुळे प्रक्रिया उदयोग सुरक्षित गुंतवणूकीचा ठोस पर्याय म्हणून विकसीत होत आहे.
६) प्रक्रिया उदयोगांच्या माध्यमातून भारताला आंतरराष्ट्रीय बाजरपेठेत आपली वैशिष्टयपूर्ण प्रतिमा निर्माण करता येईल.
७) प्रक्रिया उदयोगांचे महत्व वाढत असल्यामुळे या क्षेत्रात थेट परकीय गुंतवणूक आकर्षिक केली जावू शकते.
८) केळी पिकापासून विविध उत्पादने तयार करता येतात हे तामिळनाडू राज्यातील त्रिची येथील राष्ट्रीय संशोधन केंद्राने सिध्द केले आहे.
९) लघु उदयोग सुरु करु इच्छिणाऱ्या उदयोजकांना कमी खर्चात केळी प्रक्रिया उदयोंग सुरु करणे शक्य आहे.
१०) ग्राहकांना स्वच्छ प्रक्रियायुक्त पदार्थ आरोग्य विषयक खबरदारीसह रास्त किंमतीत उपलब्ध करुन देणे शक्य आहे.

**केळी प्रक्रीया उदयोगामुळे प्राप्त होणारे अपेक्षित लाभ**

१) फेकून देण्यात येणाऱ्या प्रत्येक केळीच्या खोडापासून शेतकऱ्यांना उत्पन्न मिळून शेतकरी आर्थिकदृष्टया सक्षम होण्यास मदत होईल.
२) केळी पिकाच्या खोडांच्या विल्हेवाटीसाठी लागणाऱ्या खर्चात बचत होवून उत्पादन खर्चात घट होईल.
३) वाया जाणाऱ्या केळी पिकाच्या कचऱ्यापासून मूल्यवर्धित उत्पादने तयार होतील.
४) केळी पिकाच्या वाया जाणाऱ्या अवशेषांपासून सेंद्रीय खते तयार करुन शेतीचा कस वाढता येईल.
५) वापसा झालेली, तुटलेली, फाटलेली, पिकलेली, वाया जाणारी केळी प्रक्रिया उदयोगात उपयोगात आणता येईल. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक नुकसानीला आळा बसेल.
६) गावा -गावातील युवक, महिला आणि पुरुषांना रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी प्राप्त होऊन गावे आर्थिकदृष्टया समृध्द होतील.
७) युवकांचा शेती क्षेत्रामध्ये असलेला अपेक्षित सहभाग वाढून ग्रामीण भागातील युवकांच्या स्थलांतराला आळा बसेल.
८) केळी प्रक्रिया उदयोगामुळे गावा-गावांना आर्थिक पाठबळ लाभेल. त्यामुळे गावे पर्यायाने शेतकरी आणि शेतमजूर समृध्द होतील.
९) शेतकऱ्यांनी कष्टाने पिकविलेल्या केळी मालाला किफायतशीर किंमत मिळण्यास मदत होईल.
१०) अन्न प्रक्रिया उदयोगामध्ये संशोधन व विकासाला चालना मिळून ग्रामीण भागात पायाभूत सेवा-सुविधा निर्माण होऊन खेडेगावे आत्मनिर्भर व सक्षम होतील.

**केळी प्रक्रिया उदयोगा समोरील आव्हाने -**

१) प्रक्रियायुक्त अन्नपदार्थांच्या पोषक घटकांबाबत ग्राहकांमध्ये जागृती निर्माण करण्याचे आव्हान.
२) ग्राहकांना ताजे आणि किफायतशिर किंमतीत उत्पादने पुरविण्यासाठी फुड सेफ्टी मानकाबद्दल नवउदयोजकांमध्ये जागृती निर्माण करण्याचे आव्हान.
३) स्थिर आणि बदलत्या भांडवलाबरोबरच कुशल कामगारांच्या पुरवठा करण्याचे आव्हान.
४) कृषी प्रगतीशी संबंधित असलेल्या सरकारी संस्था, खाजगी संस्था, सहकारी संस्था, शेतकरी, स्वयंसेवी गट या सर्वांचा सक्रीय सहभाग प्राप्त करुन घेण्याचे आव्हान.
५) सामान्य शेतकऱ्याचे रुपांतर कृषी उदेयाजकामध्ये करण्यासाठी अत्यंत अल्पखर्ची तंत्रज्ञान उपलब्ध करण्याचे आव्हान.
६) पायाभूत सेवा-सुविध संग्रहण, वाहतुक, मार्केटिंग, शीतगृहांची साखळी, मालाची हाताळणी, प्रक्रियायुक्त अन्नाचे पॅकेजिंग या विषयावरील संशोधन उपलब्ध करण्याचे आव्हान.
७) केळी प्रक्रियायुत उत्पादनाच्या निर्यातीसाठी जिल्हा स्तरावर आवश्यक सेवा सुविधा उभारण्याचे आव्हान.
८) केळी फळाच्या गुणवत्तेमध्ये दिवसें दिवस होत जाणारी घसरण थांबविण्याचे आव्हान.

९) अन्न सुरक्षा विषयक कायदयांमध्ये सुसूत्रता निर्माण करण्याचे आव्हान.
१०) जागतिकीकरणाच्या काळात बदलत्या परिस्थितीचा लाभ उठविण्यासाठी बाजापेठांचे तंत्रमंत्र, व्यापाराच्या पध्दती, आंतरराष्ट्रीय व्यापाराचे कायदे, बौध्दिक स्वामित्व हक्क या सारख्या विविध बाबीं संदर्भात उदयोजकांमध्ये जागृती करण्याचे आव्हान.

### उपाय योजना -

१) चक्रीवादळासह गारपीट आणि अस्थिर बाजार भावामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्रक्रिया उदयोग शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहचविण्याशिवाय केळी शेतकऱ्यांसाठी 'कल्पतरु' ठरणार नाही. त्यादृष्टीने प्रयत्नांना कृतीची जोड देण्याची आवश्यकता आहे .
२) फुडपार्कच्या निर्मितीसाठी संशोधन, सर्वेक्षण आणि प्रक्रिया या त्रिसुत्रीवर अधिक भर देण्यात यावा.
३) प्रक्रिया उदयोग सुरु करणाऱ्या नवउदयोजकांसाठी सरकारने जिल्हा स्तरावर प्रशिक्षण शिबीरांचे आयोजन करावे.
४) प्रक्रियायुक्त उत्पादनाच्या विक्रीसाठी शासनाने शाश्वत बाजारपेठ उपलब्ध करुन दयावी.
५) कृषी विद्यापीठे आणि संशोधन केंद्रांनी नवउदयोजकांना प्रशिक्षित करण्यासाठी आपल्या बहुमुखी क्षमतांचा वापर केला पाहीजे. वैज्ञानिक संशोधन हाच कृषी शिक्षणाचा पाया बनला पाहीजे.
६) प्रक्रियायुक्त केळी मालाच्या निर्यातीसाठी सरकारने निर्यातकर रद्द करुन निर्यातीवरील बंधने दूर करावीत.
७) प्रक्रिया उदयोगांना आधुनिक यंत्रसामग्रीची खरेदी करण्यासाठी बँकांनी अग्रक्रमांने कर्ज पुरवठा करावा आणि उदयोग विकासासाठी शासनाने अनुदान दयावे.
८) केळी प्रक्रिया उदयोगांच्या विकासासाठी 'केळी प्रक्रिया उदयोग विकास महामंडळाची' स्थापना करण्यात यावी. ज्या अंतर्गत या उदयोगासाठी कर्ज पुरवठा, प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि अनुदान देवून युवकांना प्रक्रिया उदयोग उभे करण्यासाठी आकर्षित करता येईल.
९) केळी प्रक्रियायुक्त उत्पादनाच्या निर्यातीसाठी निर्यातदारांची एक स्वंतत्र सरकारमान्य संस्था स्थापन करावी. या संस्थांमार्फत उत्पादकांना उत्पादनाच्या किंमती निश्चित करता येतील.
१०) सरकार, संशोधन संस्था, निर्यातदार संघटना, प्रक्रिया उदयोग आणि ग्राहक यांच्या संबंधात समतोल निर्माण करणे.

### संदर्भ सूची


१) कृषि सांख्यिकी विषयक माहिती महाराष्ट्र राज्य २००६, भाग-२.
२) महाराष्टाची आर्थिक पाहणी २००९-१०
३) योजना विशेषांक - जानेवारी २०११
४) कृषिपणन मित्र - ऑगस्ट २०१०
५) उदयोजक -मे २०१५
६) उदयोजक -मार्च २०१४





**प्रा बी एल बाविस्कर**
गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख , गि.द.महाजन कला, श्री. के.रा.नवलखा वाणिज्य आणि मनोहरशेठ धारीवाल विज्ञान महाविदयालय,जामनेर जि.जळगांव.